Original Article
ISSN (Online): 2582-7472

ShodhKosh: Journal of Visual and Performing Arts
July-December 2023 4(2), 4317–4320

# VDIDAL: ASSESSMENT, TASTE AND THERAPY
# व्दिदल: आकलन, आस्वाद आणि चिकित्सा

Manisha Sanjay Thakare [1], Komal Thakare [1]

[1] Taywade College, Koradi-Mahadula, District-Nagpur, India

**DOI**
10.29121/shodhkosh.v4.i2.2023.5020

**Funding:** This research received no specific grant from any funding agency in the public, commercial, or not-for-profit sectors.

**Copyright:** © 2023 The Author(s). This work is licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.

With the license CC-BY, authors retain the copyright, allowing anyone to download, reuse, re-print, modify, distribute, and/or copy their contribution. The work must be properly attributed to its author.

OPEN ACCESS

## ABSTRACT

**English:** 'Social awareness' is an important feature of science literature. In order to bring the society out of the traditional yoke, which was mired in undesirable practices and traditions, it was necessary to adopt scientific thinking. Science is special knowledge. Science is development. Literature reflects the real society. Literary science dates back to the development at the beginning of creation. Science creates a vision of reality. Bal Fondake's story. His collection of stories, Vdidal, certainly depicts how humans and their interactions will be in the future.

**Hindi:** ‘समाजजागृती’ हे विज्ञान साहित्याचे महत्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. अनिष्ट्य प्रथा व परंपरेमध्ये आकंठ बुडालेल्या समाजाला पारंपारिक जोखडातून बाहेर काढण्यासाठी शास्त्रीय म्हणजेच वैज्ञानिक विचाराचा अंगीकार करणे आवश्यक होते. विज्ञान म्हणजेच विशेष ज्ञान. विज्ञान म्हणजेच विकास. साहित्यामधून समाजाचे वास्तव प्रतिबिंब उमटत असते. सृष्टीच्या प्रारंभातील विकासापासून साहित्यविज्ञान आढळते. विज्ञान हे वास्तविकतेचे दर्शन घडविते हेच वास्तविकतेचे दर्शन डॉ. बाळ फोंडके ह्यांच्या कथामधून दिसून येते. येणाऱ्या पुढील काळात मानव व त्याचे परस्परसंबध कसे राहील याचे चित्रण त्यांच्या ‘व्दिदल’ या कथासंग्रहामध्ये निश्चितपणे सापडते.

**Keywords:** Science Fiction, innovation capability, Motherhood, Social Awareness, Scientific Formulas, विज्ञानकथा, नवनिर्मितीक्षमता, मातृत्व, समाजजागृती, वैज्ञानिकसूत्र

## 1. प्रस्तावना

ज्ञानाच्या कक्षा रुंदावताच मानवाने प्राप्त ज्ञानाचे उपयोजन करून आपल्या गरजा भागविण्यासाठी विविध साधनांची निर्मिती केली व त्यातूनच ज्ञानसंपदा आपल्या संस्कृतीचा विस्तारणारा भाग बनला. एखादा वैज्ञानिक शोध जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याकरिता लिहिलेले लेख हे विज्ञानसाहित्यात येतात. जमिनीच्या पोटात असलेल्या सुजलाम सुफलाम या गुणाची शक्ती मानवाला कळली व या मातीला आपण आई मानू लागलो तद्वतच मातृदेवतेचे महत्वही सर्वांना पटले. स्त्रीकडेही नवीन जीवाच्या निर्मितीची शक्ती असल्यामुळे आदिशक्ती म्हणून तिचीही पूजा केली जावू लागली म्हणूनच संसारात तिचे अस्तित्व प्रकर्षाने जाणवते. ती नसेल तर कुटुंब कोमजते हीच या कथासंग्रहाची मूळ संकल्पना दिसून येते.

## 2. ‘व्दिदल’ कथासंग्रहाचे आकलन

‘व्दिदल’ हा बाळ फोंडके यांचा दोन दीर्घ कथा असलेला कथासंग्रह आहे. अलीकडील काळात ‘विज्ञानकथा’ हा प्रकार मोठ्या प्रमाणात नावारूपास आला. अनेक विज्ञान कथाकारांनी वैविध्यपूर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण असे कथाविषय हाताळून विज्ञानकथेचे दालन समृद्ध केलेले आहे. या कथाकारांमध्ये मराठीतील प्रसिद्ध विज्ञान कथाकार, विचारवंत, समीक्षक, पत्रकार, गुणग्राही संपादक व विज्ञान क्षेत्रातील ज्येष्ठ तज्ज्ञ व्यक्ती डॉ.पुरूषोत्तम गजानन फोंडके हे सुविख्यात आहेत. महाराष्ट्र साहित्य परिषदेद्वारा इंडियन सायन्स कॉंग्रेस पुरस्कार, वीर सावरकर पुरस्कार, कोकण साहित्य भूषण पुरस्कार इ. पुरस्कारांनी सन्मानित असलेल्या तसेच लंडन विद्यापीठाची डॉक्टरेट असलेल्या डॉ. फोंडके ह्यांनी विज्ञान साहित्य आणि लोकार्थी विज्ञान या दोन्ही

प्रकारच्या लेखनात आपला अमीट ठसा उमटवलेला आहे. कर्णपिशाच्च, विज्ञान प्रपंच, ओसामाचा अखेर, करोनाष्टक, अघटीत, चिरंजीव इत्यादी भक्कम विज्ञान कथा साहित्यांची रचना करून वाचकांना एक नवी विज्ञानदृष्टी प्रदान केलेली आहे. सर्वसामान्यांना समजेल या भाषेत विज्ञान कथा लिहून विज्ञान कथेकडे बघण्याचा एक नवा दृष्टीकोन दिलेला आहे. त्यासोबतच विविध प्रकारचे वैज्ञानिक रहस्य आणि वैज्ञानिक संकल्पना समजावून सांगितल्या आहेत.

मराठीमध्ये विज्ञान कथा या विज्ञान शिकविण्यासाठी लिहिल्या जात नसून विज्ञानासारखा क्लिष्ट वाटणारा विषय सोपा करून सर्व वाचकांना विज्ञान विषयाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने डॉ. फोंडके ह्यांनी लेखन केलेले आहे. त्यांच्या कथांतील नवनवीन विज्ञान संकल्पना ह्या मानवी जीवनाला विविध अंगांनी स्पर्श करणाऱ्या आहेत. फोंडके ह्यांच्या कथांमधून मानवी जीवनाचा संपूर्ण प्रवास उलगडतो, की ज्यात जगण्याचा संघर्ष, जीवसृष्टीशी जुळवणारा समतोल, मानवी मनावरचा ताण, स्पर्धा यांचे प्रतिबिंब दिसून येते. किंबहुना नवनिर्मितीकडे वाटचाल करण्यासाठी ह्या कथा मार्गदर्शक ठरल्याचे वाचकांना जाणवते.

निरीक्षण, तर्क, अनुमान, प्रचीती, प्रयोग हे वैज्ञानिक दृष्टीची जाणीव करून देते. भारतामध्ये जातीव्यवस्था, चाकोरीबद्धता, अंधश्रद्धा, शिक्षण व्यवस्था, कुटुंबात एकाधिकारशाहीचे वातावरण या सर्व कारणामुळे लोकमनात वैज्ञानिक दृष्टीकोन फारसा रुजला नाही परंतु डॉ. फोंडके ह्यांच्या विज्ञानसाहित्यामुळे सत्यसंशोधनाचा मार्ग मोकळा झाला. डॉ. फोंडके ह्यांच्या साहित्यातील वैज्ञानिक दृष्टीकोनातून जीवनाचे दिशादर्शन होऊन आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली. डॉ फोंडके ह्यांचे कथासंग्रह हे वैज्ञानिक तर्क उलगडणारे असून त्यातील कथा वैज्ञानिकतेला केंद्रभूत मानून जरी गुंफल्या असल्या तरी कथालालीत्याला कुठेही बाधा आल्याचे दिसून येत नाही. या कथांमध्ये जशी सौंदर्यमानता आहे तशाच त्या आस्वाद्य अशा कथा आहेत. इतकेच नव्हे तर त्या कथा प्रेरक आहेत. याचाच अर्थ अक्षर वाङ्मयीन कलाकृती म्हणून तिचा उल्लेख करणे क्रमप्राप्त ठरते. डॉ. फोंडके ह्यांच्या अनेक वाङ्मयीन वैशिष्ट्यापैकी एक महत्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी इतर देशातील आणि भाषातील श्रेष्ठ विज्ञानकथांचा परिचय मराठी वाचकांना करून दिला. त्यांच्या कथांचे भाषांतर (अनुवाद) जर्मन, फ्रेंच, स्पॅनिश, इटालियन, हिंदी, बंगाली, ओरिसा, कन्नड अशा विविध भाषांमध्ये झालेले आहेत.

त्यांचा 'व्दिदल' हा कथासंग्रह मेहता पब्लिशिंग हॉऊस, पुणे अंतर्गत ऑक्टोबर २०१६ साली प्रसिद्ध झाला. या कथासंग्रहाच्या मुखपृष्ठावरील चित्र अत्यंत सूचक आहे. मुखपृष्ठावर बंदुकीचे चित्र असून बंदुकीतील गोळी सुटताना दिसत आहे ; तर त्याचवेळी ट्रिगरवर स्वतःची ओळख लपविणाऱ्या व्यक्तीचे चित्र आहे. गुन्हेगारी प्रवृत्ती दर्शविणाऱ्या दोन दीर्घ कथांचा समावेश असलेल्या या कथासंग्रहामध्ये विज्ञान, तंत्रज्ञान आणि पोलीस यांची त्रिवेणी सांगड घातली गेली आहे. पोलीस आयुक्त अमृतराव मोहिते आणि वैज्ञानिक डॉ. कौशिक या जोडीच्या गुन्हेगारीचा शोध घेण्याच्या मोहिमांविषयीच्या विज्ञान कहाण्या म्हणजे व्दिदल होय. यात पोलीस आयुक्त मोहिते व डॉ. कौशिक ही मुख्य पात्रे आहेत तर इतर गौण पात्रांचा परिचय लेखकांनी या कथांच्या रूपाने घडविलेला आहे.

## 3. गुन्हेगारी प्रवृतीला आळा घालणारी कथा

मानवी समाज जितका प्राचीन तितकी गुन्हेगारी सुद्धा प्राचीन आहे. सामाजिक सुरक्षितता व सामाजिक कल्याण हे गुन्हेगारी प्रवृत्तीमुळे धोक्यात आले असून समाजापुढे गुन्हेगारीचे मोठे आव्हान आहे. आज गुन्हेगारीने गंभीर स्वरूप धारण केल्यामुळे पोलीस व कायदेशीर यंत्रणा यांना खूप मोठी डोकेदुखी झालेली आहे. हेच सामाजिक भान लक्षात घेऊन डॉ. फोंडके ह्यांनी मनोरंजनासोबतच सामाजिक प्रबोधनासाठीही विज्ञानकथा मांडलेल्या आहेत. त्यांच्या अनेक कथासंग्रहातून त्यांनी विज्ञानातील नवनवीन संकल्पनांचा वापर गुन्हांच्या शोधासाठी करून या प्रवृत्तीला फाटा दिल्याचे दिसून येते. ज्यावेळेस हातांच्या बोटांच्या ठशांचा उपयोग गुन्ह्याच्या शोधांमध्ये होवू लागला तेव्हाच विज्ञान, तंत्रज्ञान आणि पोलीस यांची सांगड घातली गेली. नवनवीन तंत्रज्ञानाचा व यंत्रणाचा वापर अधिकाधिक गुन्हांच्या तपासासाठी वापरून त्यांनी समाजातील गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालण्यास मदत केल्याचे दिसून येते आहे. त्यामधील व्दिदल, कर्णपिशाच, अघटीत इ. कथासंग्रहातून त्यांनी गुन्हेगारी प्रवृत्तीला आळा घालणाऱ्या अनेक वैज्ञानिक संकल्पना मांडल्याचे दिसून येते.

"व्दिदल" कथासंग्रहातील 'नार्सिसस' ही कथा प्रसिद्ध वैज्ञानिक स्टीफन हॉकिन्स यांच्या व्यक्तिमत्वावर आधारलेली आहे. या कथेतील मुख्य पात्र डॉ. अमर बोस हे एक जेष्ठ शास्त्रज्ञ आहेत. ते मूळ भारतीय असून बऱ्याच वर्षापासून ते अमेरिकेत स्थायिक झालेले असतात. एक उच्च दर्जाचा आंतरराष्ट्रीय कीर्तीचा वैज्ञानिक म्हणून डॉ. बोसांची ओळख संपूर्ण जगाला होतीच. त्यांचे ज्ञान प्रगाढ होते. त्यांच्या संशोधनासंबंधी ते कुणाशीही सहजगत्या सवांद साधत असत. समकक्ष विद्वानांशी चर्चा करतांना विद्यार्थी त्यांच्या ज्ञानाने भारावून जात असत. ज्यांचा विज्ञानाशी सुतरामही संबंध नाही, अशा सामान्य जनांनाही ते तो गहन विषय अतिशय सुबोध, प्रासादिक भाषेत समजावून सांगू शकत असतं. अलीकडे डॉ. बोस सपत्नीक भारतात महिनाभर थांबणार होते तेथील इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये त्यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला असतो. त्यांच्या जाहीर व्याख्यानाला नेहमीच गर्दी होत असते. ती त्यांच्या विद्वत्तेची व वक्तृत्वाची कीर्ती ऐकून अमृतराव व कौशिकांसारखी मंडळीसुद्धा व्याख्यानाला हजेरी लावतात. व्याख्यानाकरिता मंचावर डॉ. बोस येतात तेव्हा त्यांचे दुबळे शरीर पाहून सर्वांना आश्चर्याचा धक्का बसतो. एक दुर्धर आजार त्यांना जडला असल्यामुळे त्यातील मोटर न्यूरॉनमुळे त्यांचे शरीर विकलांग झालेले असते. चालण्या फिरण्यासाठीच नव्हे तर बोलण्यासाठीसुद्धा त्यांना यंत्राची मदत घ्यावी लागत असते. त्यांचे शरीर विकल आणि जर्जर झाले असले तरी त्यांचा मेंदू, बुद्धी, स्मरणशक्ती अगदीच तेजतर्रार असते. मानवी शरीर हे मुख्य नसून मेंदू हा महत्वाचा असतो. तो संपूर्ण शरीराला संयमित करीत असतो. शरीर हे केवळ साहाय्यभूत असते. याच सिद्धांतावर ते व्याख्यान देणार असतात. पण त्यांना शरीराची सहज हालचाल करणेसुद्धा शक्य होत नव्हते. त्याचे शरीर कलंडलेल्या अवस्थेत वेडेवाकडे पसरलेल होते. मान टेकलेली होती. शरीरावर सुरकुत्या होत्या. हातपाय जवळजवळ काडीसारखे झालेले होते . त्यांच्या शरीरात चेतनेची जराशीही खुण दिसत नव्हती. त्यांचे एका

निर्जीव बाहुल्यात रुपांतर झाले होत. केवळ व्याख्यान देतानाच त्या देहात चैतन्य यायचे. या सर्व विपरीत परिस्थितीत त्यांची पत्नी सौ. शर्मिला सावलीसारखी त्यांच्यासोबत राहून त्यांचा सांभाळ करीत होती.

हॉटेलमधील एका आलिशान स्वीटमध्ये श्री व सौ बोस यांच्या राहण्याची व्यवस्था असतांना एका रात्री अचानकपणे त्यांच्यावर जीवघेणा हल्ला होतो. सौ. शर्मिला बोस पोलिसात तक्रार नोंदवितात आणि पोलीस तपास सुरु होतो. एका वृद्ध विकलांग शास्त्रज्ञांवर का? व कसा? हल्ला केला गेला असेल? ह्याचा तपास पोलीस आयुक्त अमृतराव मोहिते व वैज्ञानिक डॉ. कौशिक करतात. लेखकांनी अतिशय चित्तथरारक असे या तपासाचे वर्णन कथेमध्ये केलेले आहे. पोलीस तपासाला विज्ञानाची जोड मिळाली तर कोणत्याही गुन्ह्याचा छडा लावणे सहज शक्य होते हे या कथेअंती दिसून येते.

कथासंग्रहातील दुसरी कथा “कोव्हॅलंट बाँड” (covalent bond) ही होय. या कथेमध्ये माधवी वाटवे व जयंती पारेख ही दोन स्त्री पात्रे महत्वाची भूमिका वठविताना दिसतात. या दोन्ही स्त्रिया एकाच मुलीवर स्वतःची मुलगी असण्याचा हक्क दाखवितात. दोघीही तसे पुरावे सादर करतात. त्यावरून ती मुलगी कधी माधवी वाटवे यांची तर कधी जयंती पारेख यांची असल्याचे जाणवते. दोघींजवळही त्या मुलीच्या जन्म दाखल्याचे पुरावे असतात. जयंती पारेख यांची मुलगी तोरल पारेख ही काही दिवसापासून बेपत्ता असल्याची तक्रारसुद्धा ते नोंदवितात. तोरल ही मुलगी सापडण्याची चिन्हे न दिसल्यामुळे एका प्रायव्हेट इन्व्हेस्टीगेटरला तिला आणून देण्याची जबाबदारी सौ. पारेख देतात. डिटेक्टीव्ह मुलीचे अपहरण करत आहे या संशयाने इन्स्पेक्टर, नीरा व मुकुंद हे पोलिस पतीपत्नी त्याला पोलिस स्टेशनला बोलवितात. तिथे मुलीला तिची खरी आई माधवी वाटवे यांच्याकडे सोपवितात. दिवसेंदिवस हा तिढा अधिकच गुंतागुंतीचा होतांना दिसतो. तपासणी करणारे पोलिस, नीरा व मुकुंद संभ्रमात सापडतात. प्रकरणाचे गांभीर्य पाहता मुकुंदराव व वैज्ञानिक डॉ. कौशिक हे वैज्ञानिक पद्धतीने तपासकार्य चालवितात. डॉ. कौशिक यांच्या सांगण्यावरून डीएनए टेस्ट करायचे ठरते. प्रथम मोनिका आणि माधवी वाटवे या मायलेकींच्या मायटोकोन्ड्रियल डीएनएमध्ये काहीच मॅच मिळत नाही. तसेच दोघींच्या नुक्लिअर डीएनएमध्ये सुद्धा मॅच नसतो. तर मोनिका ही माधवी वाटवेची मुलगी नसल्याचे धक्कादायक रिपोर्ट समोर येतात. जसजसे तपासकार्य पुढे जाते त्यावरून मोनिका व जयंतीबेनची गेलेली मुलगी या जुळ्या बहिणी होत्या असे लक्षात येते. माधवी वाटवे या दोघींचीही आई नाही; याउलट जयंतीबेन पारेख या दोघींचीही आई असल्याचे यातून सिद्ध होते.

आता दोन्ही मुलींचा जन्म होणाऱ्या मल्होत्रा क्लिनिककडे तपास वळतो. त्या दोन्ही मुली या आयडेनटीकल ट्वीन्स नसून फ्रटर्नल ट्वीन्स असल्याचे डॉ. कौशिकांच्या लक्ष्यात येते. माधवी वाटवे यांचे स्त्रीबीज सक्षम नसल्यामुळे, त्यातून गर्भांकुर रुजत नसल्यामुळे जयंती पारेख यांचे स्त्रीबीज माधवीच्या गर्भाशयात रुजविले जाते. म्हणजेच मोनिकाची बिजदात्री आई जयंतीबेन पारेख माधवी वाटवे तर जन्मदात्री आई माधवी वाटवे असते. या सर्व अनभिज्ञ आणि गुंतागुंतीच्या नातेबंधातून, अपत्य प्राप्तीच्या उत्कट इच्छेतून निर्माण झालेला झालेल्या कौटुंबिक आणि सामाजिक प्रश्नाचा वेध घेणारा तसेच प्रेम, विश्वास, सहानुभूती आदींचा मागोवा घेणारा आणि यासोबतच वैज्ञानिक शोधामुळे नवे नैतिक प्रश्न मानवासमोर उभे करणारा हा कथासंग्रह आहे. कथेमध्ये वैज्ञानिक अंगाने सतत येणारे नवनवे पैलू वाचकांची उत्कंठा वाढविणारे आहेत. ज्याप्रमाणे सहसंयोजन बंध तयार करणारी इलेक्ट्रॉनची जोडी असते त्याप्रमाणेच एकाच मुलीविषयी दोन आईचा बंध दाखविणारी ही कथा नावाप्रमाणेच दोन मुलिंमधला ‘सहसंयोजन बंध’ (covalent bond) दर्शविते. तसेच मानसशास्त्रीय पातळीवर चिंतन करण्यास प्रवृत्त करते.

## 4. दोन कथांचा तुलनात्मक विचार

‘नार्सिसस’ व ‘कोव्हॅलंट बाँड’ (covalent bond) या कथांमध्ये दिसून येणारे सामायिक तत्त्व जे मला जाणवले की, या विज्ञान शोध कथा भविष्यातील मानवी जीवनात विज्ञानाने केलेली उलथापालथ, विज्ञानाने केलेली क्रांती व विज्ञानाची घोडदौड या दोन्ही गोष्टींचे चित्रण करणाऱ्या ठरतात. गुन्ह्यांचा शोध लावायचा असल्यास डॉ. कौशिक व अमृतराव मोहिते या जोडीच्या शोध मोहिमा या खरोखरच वाचकांना रंजकतेकडे नेतात. रंजनाबरोबर वाचाकमनात पुढे काय होणार याची जिज्ञासा वाढवितात. तर क्वचितप्रसंगी या कथा वैज्ञानिकतेच्या उपयोगितेवर प्रश्नचिन्ह निर्माण करतानाही दिसतात. सत्याचा शोध हे समान तत्त्व या दोन्ही कथांमध्ये दिसून येते. गुन्हेगार व पोलीस यांच्या मधल्या अनोख्या शर्यतीचे संघर्षमय दर्शन या दोन्ही कथा घडवितात.

कथासंग्रहातील लेखकांची भाषा ही ओघवती आहे. काही प्रसंगाचे वर्णन चित्तथरारकपणे करण्यात लेखक पूर्णपणे यशस्वी झालेले दिसून येत आहे. विज्ञानामुळे निर्माण झालेल्या सुखसुविधा माणसासाठी घातकही ठरू शकतात याची जाणीव कथेअंती वाचकांना झाल्याशिवाय राहत नाही. लेखकांनी काही ठिकाणी ‘इन्व्हेस्टीगेशन’, ‘कॉन्फीडेन्शीयल’ यासारख्या अनेक इंग्रजी शब्दांचा वापर केलेला दिसून येतो. तर ‘मौनम संमती लक्षणम’ यासारख्या वाक्यप्रचाराचा उल्लेखसुद्धा केलेला आहे. ज्याप्रमाणे एकच मूळ असलेल्या रोपट्याला येणारी दोन पाने वेगवेगळ्या आकाराची असतात, त्यांच्या शिरा, देठ हे वेगवेगळ्या आकाराचे, रंगाचे व रूपाचे असते पण दोन्हीचे मूळ एकच त्याप्रमाणे या कथासंग्रहातील दोन कथा एकाच वैज्ञानिक सूत्रातून आकार घेणाऱ्या आहेत परंतु वेगळ्या धाटणीच्या दिसून येतात. दोन्ही कथांना अतिशय सूचक असे शिर्षक दिलेले असून बोलके असे मुखपृष्ठ या कथासंग्रहाचे आहे. या कथेने मराठी विज्ञान कथेत आपले एक स्वतंत्र स्थान निर्माण केलेले आहे. आशयाभिव्यक्तीची अनेक सौंदर्यपूर्ण वैशिष्ट्ये या कथेला लाभलेली असल्यामुळे रसिक मनाचा वेध घेणारी विज्ञान कथा म्हणून तिचे स्थान अबाधितच राहील यात शंका नाही. या कथेवरून कथालेखकाच्या पृथगात्म वाङ्मयीन व्यक्तिमत्वाचा प्रत्यय आपल्याला येतो.

## CONFLICT OF INTERESTS

None.


## ACKNOWLEDGMENTS

None.


## REFERENCES


व्दिदल, डॉ बाळ फोंडके, मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे, २०१६.

मराठी विज्ञान साहित्य- स्वरूप, व्याप्ती व बदलते परीप्रेक्ष्य, डॉ. संजय शिंदे, प्रशांत पब्लिकेशन.जळगाव, २०२२.

सक्षम समीक्षा, विद्या लेखांक  डॉ. संजय ढोले, साहित्य विशेषांक, शब्दावली प्रकाशन, पुणे, २०२४.

मराठी साहित्य व मानवी मूल्ये, संपादक, परिकल्पना, २०२२.